महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

जनसंपर्क विभाग : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
'प्रकाशगड', प्लॉट क्र. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, ४ था मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
संकेतस्थळ : www.mahadiscom.in दूरध्वनी : ०२२-६९८५२२०० ईमेल-prodiscomm@gmail.com
टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३४३५, १८००-२१२-३४३५, १९१२, १९१२०



प्रेसनोट इंग्रजी व मराठी - दि. 28 फेब्रुवारी 2026

छतावरील सौरऊर्जा प्रकल्पाच्या खर्चात महावितरणमुळे प्रती किलोवॅट १५ हजाराची बचत, वीज ग्राहकांचा फायदा

मुंबई, २८ फेब्रुवारी २०२६: महिना शंभर युनिटपर्यंत वीज वापर असलेल्या दारिद्र्य रेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घरगुती वीज ग्राहकांना मोफत वीज मिळण्यासाठी राज्य सरकारने सुरू केलेल्या स्मार्ट योजनेसाठी महावितरणने मागविलेल्या टेंडरमध्ये एक किलोवॅट क्षमतेच्या छतावरील सौरऊर्जा प्रकल्पाची किंमत सुमारे ४५ हजार रुपये निश्चित करण्यात आली आहे. सध्या सौरऊर्जा पुरवठादार आकारत असलेल्या साठ हजार रुपये या दराच्या तुलनेत नवा दर १५ हजार रुपये कमी असल्याने योजनेच्या लाभार्थी ५ लाख छोट्या ग्राहकांची खूप मोठी बचत होणार आहे. तसेच साठ हजारच्या ऐवजी ४५ हजार रुपयात एक किलोवॅटचा छतावरील सौरऊर्जा बसविता येत असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे आगामी काळात असे प्रकल्प बसविणाऱ्या सर्व गरजू ग्राहकांना लाभ होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात गरीब ग्राहकांसाठी स्मार्ट योजना राबविण्यात येत आहे. त्यासाठी महावितरणला अंमलबजावणी यंत्रणा म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी मुंबईत झालेल्या कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत स्मार्ट योजनेच्या टेंडरला मान्यता देण्यात आली. बैठकीस राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला उपस्थित होत्या.

राज्य सरकारच्या स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप सोलार (स्मार्ट) योजनेच्या शासननिर्णयात प्रति किलोवॅट पन्नास हजार रुपये खर्च गृहित धरला आहे. सध्या व्यवहारात सोलर पुरवठादार व्यावसायिक ग्राहकांकडून प्रती किलोवॅट सुमारे साठ हजार रुपये आकारत आहेत. पण महावितरणने आज मंजूर केलेल्या टेंडरमध्ये प्रती किलोवॅट ४५,४५० रुपये इतकी रक्कम स्पष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे या योजनेत ग्राहकाने भरायच्या हिश्श्याच्या रकमेत आता मोठी कपात होईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारकडून फेब्रुवारी २०२४ मध्ये प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू करण्यात आली आहे. यामध्ये घरगुती वीज ग्राहकांना छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी एक किलोवॅटला तीस हजार रुपये, दोन किलोवॅटला साठ हजार रुपये व तीन किलोवॅटला ७८ हजार रुपये थेट अनुदान मिळते. ऊर्वरित खर्च ग्राहकाने करायचा असतो. एक किलोवॅटच्या प्रकल्पातून दरमहा सुमारे १२० युनिट वीज तयार होते. ग्राहकाच्या गरजेपेक्षा जास्त वीज तयार झाल्यामुळे वीजबिल शून्य येते व ग्राहकाला अतिरिक्त वीज महावितरणला विकून उत्पन्नही मिळते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने या योजनेत राज्यातर्फे आणखी अनुदान देऊन दारिद्र्य रेषेखालील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पाच

लाख ग्राहकांसाठी स्मार्ट योजना आणली आहे. प्रत्येकी एक किलोवॅटचे सौरऊर्जा प्रकल्प या योजनेत बसविण्यात येतील.

महावितरणने स्मार्ट योजनेसाठी मागवलेल्या टेंडरमध्ये एक किलोवॅटच्या सौरऊर्जा प्रकल्पासाठी ४५,४५० रुपये इतका कमी दर निश्चित झाल्यामुळे आता अन्य गरजू वीज ग्राहकांनाही लाभ होणार आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत सरकारी अनुदानाशिवाय ऊर्वरित रक्कम ग्राहकाला भरावी लागते. या रकमेत मोठी घट झाल्यामुळे छोट्या गरजू वीज ग्राहकांना योजनेचा लाभ घेणे अधिक सोपे होईल.

सौरऊर्जा प्रकल्प बसविणाऱ्या सूचिबद्ध पुरवठादारांची यादी महावितरणने आपल्या वेबसाईटवर आणि स्मार्ट योजनेच्या पोर्टलवर उपलब्ध केली आहे.

Mahavitaran helps in saving Rs. 15,000 per KW in roof top solar projects

Huge benefit for power consumers

Mumbai, 28th February 2026: In the tender called by Mahavitaran for the SMART scheme launched by the state government to provide free electricity to below poverty line (BPL) and economically weak domestic electricity consumers with electricity consumption up to 100 units per month, the price of a one kilowatt capacity rooftop solar power project has been quoted at around Rs 45,000. As the new rate is Rs 15,000 less than the current rate of Rs 60,000 charged by solar energy suppliers in the market, there will be a huge saving for 5 lakh small consumers who are beneficiaries of the scheme. Also, since it is clear that one kilowatt rooftop solar power can be installed for Rs 45,000 instead of Rs 60,000, all the needy consumers who install such projects will benefit in the future.

The SMART scheme is being implemented for poor consumers under the leadership of Chief Minister Devendra Fadnavis. For this, Mahavitaran has been given the responsibility of implementation. The tender for the scheme was approved in a meeting of the company's board of directors held in Mumbai on Saturday under the chairmanship of Mahavitaran's Chairman and Managing Director (CMD) Lokesh Chandra. State's Additional Chief Secretary (Energy) Abha Shukla was present for the meeting.

The state government's Swayampurna Maharashtra Residential Roof Top Solar (SMART) scheme has assumed a cost of Rs 50,000 per kilowatt. Currently, solar suppliers are charging customers about Rs 60,000 per kilowatt. But in the tender approved by Mahavitaran today, an amount of Rs 45,450 per kilowatt has been

quoted. Therefore, there will be a big reduction in the amount to be paid by the customer in this scheme.

The Pradhan Mantri Suryaghar Muft Bijalee Yojana has been launched by the government of Prime Minister Narendra Modi in February 2024. Under this, domestic electricity consumers get a direct subsidy of Rs 30,000 for one kilowatt, Rs 60,000 for two kilowatt and Rs 78,000 for three kilowatt for installing rooftop solar power generation projects. The remaining cost has to be borne by the consumer. About 120 unit of electricity is generated per month from a one-kilowatt project. Since more electricity is generated than the consumer's requirement, the electricity bill is zero and the consumer also gets income by selling the excess electricity to Mahavitaran. Chief Minister Devendra Fadnavis' government has introduced SMART scheme for five lakh BPL and economically weaker section consumers by providing additional subsidy in this scheme. Solar power projects of one kilowatt each will be installed under this scheme.

In the tender called by Mahavitaran for the smart scheme, the low rate of Rs 45,450 for a one kilowatt solar power project has been quoted, so now other needy electricity consumers will also benefit. In the Pradhan Mantri Suryaghar Muft Bijlee Yojana, the consumer has to pay the remaining amount apart from the government subsidy. Due to a significant reduction in this amount, it will be easier for small needy electricity consumers to take advantage of the scheme.

Mahavitaran has made the list of empanelled vendors installing solar power projects available on its website and on the SMART Scheme portal.
